

# चुरणी वर्तुळात बिबट, सांबर आढळले मृतावस्थेत

## विषप्रयोगाची शक्यता | मेळघाटच्या जंगलात वण्यप्राण्याच्या मृत्यूत वाढ





**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी ( दि.27 )**- नुकतेच अंजनगाव वनपरिक्षेत्रअंतर्गत वाघाची शिकार झाल्याचे समोर आले होते. या प्रकरणाचा संपुर्ण सोक्षमोक्ष लागत नाही, तेच मेळघाटमध्ये चिखलदरा वनपरिक्षेत्रातील मेळघाट व्याघ्र प्रकल्प गुगामल वन्यजीवअंतर्गत चुरणी वर्तुळात सोमवारी( दि.27) एकावेळी बिबट आणि सांबर हरिण मृतावस्थेत आढळल्याने एकच खळबळ उडाली. या वण्यप्राण्यांवर विषप्रयोग केली असल्याची प्राथमिक शक्यता वर्तविण्यात येत आहे. जंगलात आणखी कोठे वण्यप्राणी दगावला आहे, का याचा शोध घेतला जात आहे.

सोमवारी सकाळी साडे दहाच्या सुमारास वन कर्मचारी चुरणी वर्तुळात गस्तीवर असताना त्यांना एक बिबट व अगदी काही अंतरावर एक सांबर हरिण मृताअवस्थेत आढळून आले. दोघांचे वय अंदाजे दोन ते अडीच वर्ष असावे असे सांगण्यात येत आहे.

### अवयव साबूत

प्रथमदर्शनी या प्राण्यांवर विषप्रयोग झाला असावा, अशी प्राथमिक शक्यता वर्तविण्यात येत आहे. या दोन्ही वण्यप्राण्यांचे अवयव साबूत असल्याने तुर्तास शिकारीकरिता यांची हत्या झाली नसावी असे म्हटल्या जात आहे. वनविभागाचे वेगवेगळी पथके घटनास्थळी दाखल झाली असून पंचनामा व पोस्टमार्टम करुन या वण्यप्राण्यांवर अंत्यसंस्कार करण्यात येईल. पोस्टमार्टम रिपोर्टनंतरच या दोघांचाही मृत्यूचे कारण पुढे येईल.

“मेळघाट व्याघ्र प्रकल्प गुगामल वन्यजीव अंतर्गत चुरणी वर्तुळ मध्ये वनखंड क्रमांक 38 मध्ये आज सकाळी साडेदहा वाजता कर्मचारी गस्तीवर असताना एक बिबट मादी तर एक सांबर नर मृतावस्थेत आढळून आले. दोघांचेही अवयव शाबूत आहेत.

**रामानुज बांगड,**
**विभागीय वन अधिकारी गुगामल वन्यजीव.**



# प्रत्येक भारतीयासाठी संविधान महत्त्वाचे- राज्यमंत्री नाईक

### क्रीडा संकुलात प्रजासत्ताक दिन

### चित्ररथांनी नागरिकांचे वेधले लक्ष





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )** - भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना घटनात्मक अधिकार दिले आहे. संविधान प्रत्येक भारतीयासाठी महत्त्वाचे आहे, त्यामुळे संविधानाचे प्रत्येकाने वाचन करावे, असे आवाहन उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले.

जवाहरलाल नेहरू स्टेडीयम येथे 76 वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर आदी उपस्थित होते. नाईक म्हणाले, स्वातंर्त्य सैनिकांच्या बलिदानाने देश स्वतंत्र झाला. त्यानंतर भारतीय संविधानाच्या रूपाने देशाला अमूल्य देणगी मिळाली आहे. संविधानामुळे प्रत्येक नागरिकाला अधिकार मिळाला असल्यामुळे प्रत्येकाने संविधानाचे वाचन करावे. संविधानाचा आदर राखून राज्य शासन विविध घटकांसाठी कार्य करीत आहे. शेतकऱ्यांना वेळेवर आणि वाजवी दरात बियाणे, खते उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### ॲग्रीस्टॅक चित्ररथाला दाखविली हिरवी झेंडी

सुरवातीला ध्वजरोहनानंतर राज्यमंत्री नाईक यांनी परेडचे निरीक्षण केले. सामाजिक न्याय विभागातर्फे संविधानाची प्रत आणि उद्देशिकेची भेट त्यांना देण्यात आली. यावेळी पोलिस, होमगार्ड, राष्ट्रीय छात्र सेना, स्काऊट गाईड पथक यांनी संचलन केले. यावेळी सामाजिक न्याय विभाग, महिला व बालविकास विभाग, कौशल्य विकास विभाग, जलद प्रतिसाद पथक, दामिनी पथक, अग्निशमन,परिवहन महामंडळ, श्वान पथक, शिवाजी संस्था, सामाजिक वनीकरण आदी विभागांच्या चित्ररथाने संचलन केले. मान्यवरांनी ॲग्रीस्टॅक चित्ररथाला हिरवी झेंडी दाखविली. तसेच खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या खासदार निधीतून दिव्यांगांना तीनचाकी वाहनाचे वाटप करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.



# धारणीत वगारीला केले ठार

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.27 )** - शहरातील सीताराम कॉलनी परिसरात गेल्या चार दिवसांपासून एका अस्वलाने धुमाकूळ घातला आहे. 25 जानेवारीच्या रात्री गोरेलाल शेलेकर यांच्या शेतातील एका म्हशीच्या कालवडाला ठार केल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. अस्वलाला पकडून जंगलात सोडण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी वनविभागाकडे केली आहे. परंतू दुसरीकडे अस्वलीने वगारीला मारण्याचे कारण अनेकांना पटत नाही. कदाचित अस्वलीसह आणखी एक श्वापद येथे असावे अशी भीती आहे. गेल्या 4 दिवसांपासून शहरात अस्वलाची दहशत पसरली आहे. अस्वल दिवसाढवळ्या परिसरात फिरत असल्याने नागरिक धास्तावले आहे. त्यामुळे अस्वलाला पकडण्यासाठी वनविभागाने शेजारील शेतात पिंजरा लावून ठेवला आहे. तसेच वनविभागाच्या पथकाने दिवसभर गस्त वाढविली आहे. या अस्वलामुळे शहरातील सीताराम कॉलनीत नागरिक दहशतीत आले आहे. त्यामुळे अनेक शेतकरी आपल्या शेतात फिरकत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वनविभागाने लवकरात लवकर या अस्वलाला पकडून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

# ताज नगर, अन्सार नगर, अलीम नगर, रतनगंज येथील बांगलादेशी संशयितांची चौकशी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.27 )** - नागपुरी गेट पोलिस ठाण्याअंतर्गत विविध भागात राहणाऱ्या संशयित बांगलादेशी लोकांना 27 जानेवारी रोजी कागदपत्रांसह चौकशीसाठी पोलिस ठाण्यात बोलाविण्यात आले आहे. सीपी नवीनचंद्र रेड्डी यांच्या आदेशानुसार ठाणेदार हनुमंत उरलागोंडावार यांच्या नेतृत्वाखाली संशयित बांगलादेशींच्या तपासणी सुरु आहे. 28 जानेवारी रोजी ताज नगर, अन्सार नगर, अलीम नगर, रतन गंज येथील रहिवाशांनी बोलाविण्यात आल्याची माहिती नागपुरी गेट पोलिसांनी दिली. अमरावती आणि अकोल्यात जन्म-मृत्यूचे दाखले तयार करून बनावट कागदपत्रांच्या आधारे बांगलादेशी लोकांना दिले जात आहे. असा आरोप भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केला आहे. ज्याचा तपास करण्यासाठी राज्य सरकारने विशेष तपास समिती (एसआयटी) नेमली. या अनुषंगाने पोलिसांनी सोन्याचा कारागीरांना दस्तावेज तपासणीकरिता खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात बोलाविले होते. त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करण्याबरोबरच त्यांना कामावर ठेवणाऱ्या स्थानिक सराफा व्यापाऱ्यांचीही चौकशी करण्यात येत आहे. अद्यापपर्यंत पोलिसांच्या तपासणीत एकही संशयित सापडलेला नाही. काहींची कागदपत्रे अपूर्ण असल्याने त्यांना मूळ कागदपत्रांसह पुन्हा पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले आहे. शनिवारी व रविवारी दिवसभर कारवाई सुरूच होता. यासाठी जवळपास 50 हून अधिक लोक पोलिस ठाणयात उपस्थित होते.

# पुलावरून पडून 35 वर्षीय तरुणाचा मृत्यू



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.27 )** - शिरजगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील करजगाव येथे पुलावरून पडल्याने सोमवारी एका 35 वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. अब्दुल सादिक (रा. करजगाव) असे मृताचे नाव आहे. पुलावर कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने हा अपघात झाल्याचे स्थानिकांनी सांगितले.

हा तरुण पुलावरून जात होता. दरम्यान तोल जाऊन तो पुलावरून खाली पडला आणि गंभीर जखमी झाला. जास्त रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी शिरजगाव पोलीस ठाण्यात माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासात हा अपघात असल्याचे दिसून येत आहे. मात्र, पोलिस सर्व बाजूंनी तपास करत आहेत. या घटनेची माहिती मृताच्या कुटुंबीयांना देण्यात आली असून, त्यामुळे गावात शोककळा पसरली आहे. अशा घटनांना आळा बसावा यासाठी पुलावर सुरक्षा व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे. या अपघातामुळे परिसरातील सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव समोर आला असून, त्यामुळे स्थानिक प्रशासनावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

# डुक्कर आडवे आल्याने वाहन पलटी

## ■एक ठार, 14 जखमी

## ■भाईपूर फाट्याजवळील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.27 )**- भरधाव चारचाकी तवेरा वाहनासमोर डुक्कर आडवे आल्याने झालेल्या अपघातात एक ठार, तर 14 जण जखमी झाले. साजियाबानो अकरम अली (40, रा. खरपी तालुका परतवाडा) असे मृताचे नाव आहे. ही घटना मोर्शी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील भाईपूर फाट्याजवळील रस्त्यावर 27 जानेवारी रोजी घडली.

27 जानेवारी रोजी सायंकाळी साडेपाच ते सहा वाजताच्या सुमारास तालुक्यातील भाईपुर जवळ हा अपघात घडला. यामध्ये वाहन उलटल्याने साजियाबानो अकरम अली ही महिला ठार झाली, तर आलिशा फतेमा (वय 9 वर्ष), आयेष फातिमा (वय 10 वर्ष), जेहान अली (वय 12 वर्ष), मोसीम खान (वय 34 वर्ष), इलायत अली (वय 40 वर्ष), शीजा फातिमा (वय 14 वर्ष), अत्तहर खान (वय 13वर्ष), शहिदा बानो (वय 50 वर्ष), जहेर असलम अली (वय 5 वर्ष), फराह अंजुमन असलम अली (वय 30 वर्ष), अलीजा फतेह (वय 7 व), आरजू फत्तेमा (वय 4 वर्ष), बीबी नाज (वय 30 वर्ष) हे गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातानंतर नागरिकांनी जखमींना मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. उपजिल्हा रुग्णालय येथे जखमींवर औषध उपचार केल्यानंतर सर्व जखमींना अमरावती येथील जिल्हा रुग्णालयात पुढील उपचारासाठी हलविण्यात आले आहे. जखमी कुटुंब हे परतवाडा नजीक असलेल्या खरपी येथून तवेरा गाडी क्रमांक एम एच 12 एफ झेड 1196 ने वरुड येथे जात होते. बुरुड येथे जात असताना भाईपूर जवळ हा अपघात घडला आहे. अधिक तपास मोर्शी पोलीस करीत आहे. अपघाताची माहिती प्राप्त होताच मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार उमेश यावलकर यांनी उपजिल्हा रुग्णालय येथे जाऊन अपघातग्रस्त कुटुंबीयांचे सात्वन केले.

### तर बंदुकीने उडवून टाकेन!

**अमरावती**- राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या 28 वर्षीय विवाहितेला बंदुकीचा धाक दाखवून उडवून देण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणात पत्नीच्या तक्रारीवरून पोलिसांनी पती आणि त्याच्या कुटुंबातील दोन सदस्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अर्ध जळालेल्या अवस्थेत मिळाला मृतदेह

## ■कुरळपूर्णा शेतशिवरातील घटना

## ■हत्या की आत्महत्या, तपास सुरु

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.27 )** - चांदूरबाजार ते परतवाडा रस्त्यावरील हैदतपूर वडाळा परिसरातील कुरळपूर्णाजवळ असलेल्या वैभव काळकर यांच्या शेतातील झोपडीत जळालेल्या अवस्थेत एका इसमाचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली. हा मृतदेह शिरजगाव बंड येथील माणिकराव तुकाराम बनकर या 70 वर्षीय वृद्धाचा होता. त्यामुळे ही आत्महत्या की हत्या असा संशय बळावला आहे. या घटनेच्या अनुषंगाने पुढील तपास पोलिस करीत आहेत.

चांदूरबाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परतवाडा रस्त्यावरील हैदतपूर वडाळा गावाजवळ 27 जानेवारी रोजी सकाळी राधाकृष्ण हॉटेलचे चौकीदार माणिकराव तुकाराम बनकर यांचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत आढळून आला होता. मृताच्या मुलाने मृतदेहाची ओळख पटवली. वैभव काळकर यांच्या शेतात दोन खोल्याचे बांधकाम सुरु आहे. बांधकाम गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असून, नेहमीप्रमाणे मजुर हे कामासाठी शेतात पोहोचला असता झोपडीत जळालेला मृतदेह पाहून घाबरले आणि त्यानी ही माहिती शेत मालकाला दिली. मालकाने तात्काळ या घटनेची माहिती पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर चांदूरबाजार पोलीस ठाण्याचे ठाणेदार सूरज बोंडे आपल्या पथकासह घटनास्थळी पोहोचले. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.शुभम कुमार यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. माणिकराव बनकर हे रात्री हॉटेलवर पाळत ठेवायचे आणि रोज रात्री नऊ वाजता हॉटेल बंद करायचे, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

### हॉटेल मालकाची चौकशी

पोलीस या घटनेचा सखोल तपास करत आहेत. हा खून आहे की आत्महत्या हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी मृताचे नातेवाईक आणि राधाकृष्ण हॉटेलच्या मालकाची चौकशी सुरु केली आहे.

# 11 फूट खोल पाण्यात सायकलिंग करून ध्वजवंदन

## पोलीस कर्मचारी प्रवीण आखरे यांचे पाण्याखाली 1.51 मिनिटांचे चित्तथरारक प्रात्याक्षिक



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.27 )** – पोलीस आयुक्तालयात कार्यरत असणारे पोलिस हवालदार कॉन्स्टेबल प्रवीण आखरे यांनी 26 जानेवारी रोजी अनोख्या पध्दतीने ध्वजारोहण करून तिरंग्याला सलामी दिली. आखरे यांनी जलतरण तलावाच्या आत तब्बल अकरा फूट खोल पाण्यात 25 मीटर सायकलिंग करून 1 मिनिट 51 सेकंट श्वास रोखून धरला होता.

पोलिस हवालदार प्रवीण आखरे यांनी यापूर्वी 28 मे 2023 रोजी 22 मिनिटे 52 सेकंदात पाण्यावर तब्बल 50 आसने केली होती. त्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली होती. त्याचप्रमाणे 10 सप्टेंबर 2023 मध्ये त्यांनी 1 तास 2 मिनिटे शरीराची कुठलीही हालचाल न करता सरळ पाण्यावर उभे राहण्याची कामगिरी केली होती. त्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्डसह एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्येसुद्धा झाली होती.

21 जून 2024 रोजी जागतिक योगदिनानिमित्त त्यांनी 11 फूट खोल पाण्यात 2 मिनिटे 30 सेकंद योगासने केली होती. तर स्वातंर्त्यदिनानिमित्त 15 ऑगस्ट 2024 रोजी त्यांनी पाण्यात 90 सेकंद श्वास रोखून थांबत ध्वजारोहण केले होते. आता प्रजासत्ताकदिनानिमित्त 26 जानेवारी रोजी सकाळी त्यांनी 11 फूट खोल पाण्यात 25 मीटर सासकलिंग करून ध्वजारोहण करीत तिरंग्याला सलामी दिली.

याप्रसंगी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सागर पाटील व कल्पना बारवकर, सर्व ठाणेदार उपस्थित होते. प्रवीण आखरे यांनी यापूर्वी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड व एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे, हे विशेष.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

एक रुपया उठला जीवावर...

# विषम संख्येतील भाडेवाढ कंडक्टर, प्रवाशांमधील वादाचे कारण




**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट,( दि.27 )** - एसटी महामंडळाने शनिवार मध्यरात्रीपासून 15 टक्के भाडेवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे खेडोपाड्यातील सर्वसामान्य जनतेचा प्रवास महागला आहे. एसटीची भाडेवाढ करताना ती सम संख्येत करणे गरजेचे होते. परंतू ही भाडेवाढ विषम संख्येत झाल्याने आता, तिकीट भाड्यातील वरचा एक रुपया वाहक व प्रवाशांमधील भांडणाचे कारण बनत आहे. त्यामुळे ही भाडे वाढ एसटी प्रवासी आणि कंडक्टर यांच्यात वाद करणारी ठरली आहे.

एसटी महामंडळाने भाडेवाढ करताना ती विषम संख्येत केलेली आहे. नव्या तिकीट दरानुसार आता फुल तिकीट 11, 21, 31, 41, 51, 61, 71, 81, 91 या पटीत विषम संख्येत झाले आहे. तर हाफ तिकीट देखील 6, 11, 16, 21, 26, 31, 36, 41, 46, 51, 56 असे विषम संख्येत झाले आहे. पूर्वी भाडेवाढ करताना पाच रुपयांच्या पटीत केली जात होती. परंतू नवीन भाडेवाढ मात्र एक रुपयांच्या पटीत केली आहे. त्यामुळे प्रवाशांना तिकीट काढताना एक रुपया अतिरिक्त बाळगावा लागतो. प्रवाशांनी 10,15,25,50 रुपये दिल्यानंतर प्रवाशांकडे एक रुपया नसल्यास कंडक्टर आणि प्रवाशांमध्ये वाद होत आहे. हे टाळण्यासाठी तिकीट दरात तत्काळ बदल करावा लागणार आहे. अन्यथा कंडक्टर व प्रवाशांमधील रोजच संग्राम पहायला मिळू शकतो.

दिवाकर रावते परिवहन मंत्री असताना त्यांनी एसटी महामंडळाच्या भाड्यात सम प्रमाणाच्या पटीत भाडेवाढ केली होती. त्यामुळे प्रवाशांना सुट्टे पैसे देताना कंडक्टर आणि प्रवाशांत काही वाद झाले नाहीत. मोटार वाहन अधिनियम 1988 मधील कलम 68 ( 2) तरतुदी नुसार भाडेवाढ करण्याचे अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणाला आहेत. त्यांच्याकडे 14.95 टक्के इतकी वाढ करावी असा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दिला होता. पण त्याला मंजुरी देताना सम प्रमाणात भाडेवाढ करण्याऐवजी विषम प्रमाणात भाडेवाढ करण्यात आली आहे. तरी या संदर्भात प्राधिकरणाची पुन्हा बैठक घेऊन दुरुस्ती करण्यात यावी आणि सम प्रमाणात भाडेवाढ करावी, तरच वाहक आणि प्रवासी यांच्यात सुट्या पैशांवरुन कोणतेही तंटे होणार नाहीत असे महाराष्ट्र एसटी कर्मचारी व प्रवासी करीत आहे.

## चिल्लर पैशावरून वाद, प्रवाशाची वाहकाला मारहाण



दर्यापूर-चिल्लर पैसे देण्यावरून वाद झाल्यानंतर प्रवाशाने एसटी बसच्या वाहकाला बेदम मारहाण केली. त्यात वाहक पवन सुरेंद्र सहगल गंभीरित्या जखमी झालेत. रविवारी दुपारी दोन वाजताच्या सुमारास दर्यापूर बस स्थानकावर ही घटना घडली. रविवारी दुपारी वाहक पवन सुरेंद्र सहगल आणि चालक दिनकर सांगळे हे दर्यापूर आगाराची एम. एच. 14 बीटी 3259 क्रमांकाची बस नांदेड बुद्रुक येथून दर्यापूर येथे आणत होते. दरम्यान एका प्रवाशासोबत वाहक पवन सहगल यांचा चिल्लर पैसे देण्यावरुन वाद झाला. वाद वाढत गेल्यानंतर सदर प्रवाशाने वाहक सहगल यांना जबर मारहाण केली. त्यात सहगल यांच्या नाकाला गंभीर दुखापत झाली. त्यांच्या नाकातून रक्तस्त्राव झाला. याबाबत पवन सहगल यांनी दर्यापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी आरोपी प्रवाशाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# सण उत्सवातून महिला शक्तीचे महत्त्व अधोरेखित - आ.सुलभा खोडके

## आमदार सांस्कृतिक महोत्सवात हळदी कुंकू

■ महिलांनी लुटले विचारांचे वाण





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.27 )**- भारताला महिला शक्तीचा प्रभावशाली असा इतिहास लाभला आहे. सण उत्सवातून महिला शक्तीचे महत्त्व अधोरेखित होते. मकर संक्रांतीचे पर्व हे महिलांमध्ये नव्या जाणिवा व चेतना निर्माण करणारा उत्सव आहे. केवळ वाण लुटण्यासाठी महिला एकत्र येत नाही, तर त्यांचे सक्षमीकरण व्हावे, आर्थिक विकास साधला जावा, त्यांनी प्रत्येक क्षेत्रात भरारी घ्यावी यासाठी दिशा सुद्धा या उत्सवातून मिळत असते, असे प्रतिपादन अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी केले.

प्रवीण खोडके मेमोरियल ट्रस्ट व शोध प्रतिष्ठानच्या वतीने संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजित अमरावती आमदार सांस्कृतिक महोत्सवात हळदीकुंकवाचा कार्यक्रम पार पडला, त्यात सहभागी महिलांना मार्गदर्शन करताना आ. सुलभा खडके बोलत होत्या. या कार्यक्रमाला शहरातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी महिलांचे औक्षण करून त्यांना तिळगुळ देण्यात आले. अनेक महिलांनी सुरेख असे उखाणे सादर केले. त्यामुळे कार्यक्रमात उत्साह संचारला होता. आ. सुलभा खोडके यांच्या वतीने महिलांना भेटवस्तू सुद्धा देण्यात आल्या. काही महिलांनी हौशी खेळ सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढविली.

# आजपासून अमरावतीत 52 वे राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शन

**शिवाजी विज्ञान महाविद्यालयात आयोजन**

**चार दिवस बालवैज्ञानिकांचा मेळा**

**441 विद्यार्थी व शिक्षकांचा सहभाग**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.27 )**- 52 वे राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शन 28 जानेवारी ते 1 फेब्रुवारी या कालावधीत अमरावतीच्या श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात आयोजित करण्यात आले आहे. या विज्ञान प्रदर्शनीमध्ये राज्यभरातील बालवैज्ञानिक आपले संशोधन व प्रयोगांचे सादरीकरण करणार आहेत.

या बालविज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन 19 जानेवारी रोजी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख राहतील. तर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्यासह खा. डॉ. अनिल बोंडे, खा बळवंत वानखडे, खा. अमर काळे, आ. किरण सरनाईक, आ. धीरज लिंगाडे, आ. प्रताप अडसड, आ केशवराव काळे, प्रवीण तायडे, आ. राजेश वानखडे आ. गजानन लवटे हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र शासनाचा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या राज्यस्तरीय प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनीसाठी शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात डॉ. पंजाबराव देशमुख विज्ञान नगरी उभारण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देणे आणि विज्ञान व गणित विषयात नव्या कल्पना रुजविणे हा या प्रदर्शनीच्या आयोजनामागचा मुख्य उद्देश आहे. शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान असून पर्यावरणीय आणि सामाजिक गरजांच्या अनुषंगाने 7 उपविषयांवर आधारित प्रकल्प या प्रदर्शनीमध्ये सादर केले जातील. त्यामध्ये अन्न, आरोग्य आणि स्वच्छता, वाहतूक व दळणवळण, नैसर्गिक शेती, आपत्ती व्यवस्थापन, गणितीय मॉडेलिंग व संगणकीय विचार, कचरा व्यवस्थापन आणि संसाधन व्यवस्थापन यांचा त्यात समावेश आहे. प्रदर्शनामध्ये राज्यातील 37 जिल्ह्यांमधील 330 विद्यार्थी आणि 111 शिक्षक सहभागी होणार आहेत. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रकल्पांसोबतच शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यकांनी निर्माण केलेली उपकरणे सुद्धा प्रदर्शनीचे आकर्षण ठरणार आहेत. अमरावती जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यातील विद्यार्थ्यांना या प्रदर्शनाला भेट देता यावी यासाठी दररोज 1 हजार विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करण्यात आली आहे.

या विज्ञान प्रदर्शनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी सायन्स टॉक्स या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात देशातील नामांकित वैज्ञानिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. प्रख्यात वैज्ञानिक डॉ. शांतीस्वरूप भटनागर, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चचे प्रा. डॉ. विवेक पोलशेट्टीवार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे माजी सहाय्यक अधिष्ठाता तसेच विज्ञान भारतीचे विदर्भ प्रांत सचिव डॉ. प्रकाश ईटणकर डॉ. अविनाश मोहरील या तज्ज्ञांची प्रदर्शनादरम्यान व्याख्याने होणार आहेत.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूरच्या संचालक हर्षलता बुराडे, प्रदर्शन समन्वयक प्रा. प्रवीण राठोड व शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे, प्रा. डॉ. पंकज नागपुरे, डॉ. संगीता इंगोले यांनी सर्व शाळा व महाविद्यालयांनी प्रदर्शनीचा लाभ घेण्याच्या आवाहन केले आहे.

# एमपीएससी परीक्षेतील यशाबद्दल विशाल वाघ यांचा सत्कार



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.27 )**- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत 93 वे स्थान प्राप्त करून अन्न व औषधी प्रशासनात राजपत्रित अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल मोर्शी येथील विशाल अशोक वाघ यांचा गणराज्य दिनाचे औचित्य साधून सत्कार करण्यात आला. मोर्शी येथील माळी समाज सेवा संघ आणि सावता नगर वाचनालय तसेच सावित्रीबाई फुले महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात विशाल वाघ यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला. एमपीएससीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विशाल वाघ यांची अन्न व औषध प्रशासनात अन्नसुरक्षा अधिकारी या पदावर नियुक्ती झाली आहे. विशाल कृषी अभ्यासक्रमात पदव्युत्तर आहे. यावेळी सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या अध्यक्ष डॉ. प्रतिभा घाटोळ, मंगला भोजने आणि वाचनालयाचे अध्यक्ष केशवराव कांडलकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरिता साबळे तर संचालन आणि आभार प्रदर्शन शुभम भोजने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रमोद वानखडे, शुभम भोजने, तेजस मंगळे, प्रफुल साबळे, अश्विनी कांडलकर, वर्षा आजनकर, छाया काळे, सुष्मिता भोजने, नम्रता कांडलकर, शितल बेहेरे, वसुधा गहूकर, करुणा होले, सुरेखा वानखेडे, शैलजा आजनकर आदींनी परिश्रम घेतले.

# महापालिकेच्या कार्यक्रमात सेंट पीटर इंग्लिश स्कूलचे उत्कृष्ट प्रदर्शन

**प्रजासत्ताक दिनी आयोजन**



**महासागर प्रतिनिधी**
**बडनेरा,( दि.27 )** - प्रजासत्ताक दिनाच्या औचित्य साधून महानगरपालिकेच्या दक्षिण प्रभाग क्र.4 बडनेरा कार्यालयाच्यावतीने बडनेरामधील जय हिंद मैदानावर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये येथील सेंट पीटर इंग्लिश स्कूलने सहभाग घेवून सांस्कृतिक कार्यक्रमाचे उत्कृष्ट सादरीकरण केले. या सादरीकरणाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

सेंट पीटर इंग्लिश स्कूल शैक्षणिक, क्रीडा, राष्ट्रीय उत्सव, सामाजिक कार्यामध्ये सदैव अग्रेसर असणारी शैक्षणिक संस्था आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची कला संस्कृती लेझीम कवायत सादर करून सर्वांचे मने जिकंली. रोख बक्षीस, शील्ड व प्रमाणपत्रसुध्दा प्राप्त केले. सदर बक्षीस दक्षिण प्रभाग 4 बडनेराचे सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे व सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी संजय निकम तसेच उपअभियंता श्रीरंग तायडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे सुंदर असे संचालन कृष्णराव गभणे, प्रफुल कुकडे , बडनेरा ठाणेदार सुनील चव्हाण, माजी नगरसेवक प्रकाश बनसोड यांचेसह स्वातंर्त्य संग्राम सैनिक, माजी सैनिक ,बडनेरा शहरातील सर्वच पत्रकार बंधू-भगिनी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. सदर शील्ड प्रमाणपत्र रोख रक्कम क्रीडाशिक्षक सोनल रंगारी तसेच शाळेच्या पर्यवेशिका ज्योती गावंडे मान्यवर अतिथी च्या हस्ते स्विकारले. यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.रेव्हरेंट वीरसेन आगलावे, शाळेचे डायरेक्टर रिना आगलावे, मुख्याध्यापिका नीलिमा साऊरकर मॅम , तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व प्रमोद काळे सर, सहभागी विद्यार्थी व सहभागी विद्यार्थ्यांचे पालक तसेच आयोजन करण्या करता मदत करणारे म.न.पा कर्मचारी पुंडलिक मोहतुरे, अक्षय दातेराव, देवा शिंदे, भानुदास वाहने, श्रीकांत खंडारे, सचिन तिरपुडे, राहुल सहारे, रमेश अंबाडकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## चारित्र्यावर संशय घेऊन छळ

**अमरावती** - वरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या 33 वर्षीय विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा छळ करण्यात आला. पती, सासू, सासरे यांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप महिलेने केला आहे.

# मुख्याध्यापक दिनेश भागवत यांच्या वरील निलंबनाची कारवाई मागे घ्या!

■ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

■ अडगाव शाळेत पोषण आहारातून विषबाधा झाल्याचे प्रकरण



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.27 )**- तालुक्यातील अडगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील पोषण आहारातून विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्या प्रकरणी शाळेचे मुख्याध्यापक दिनेश भागवत यांचेवर करण्यात आलेली निलंबनाची कारवाई त्वरित मागे घेण्यात यावी. अशा आशयाचे एक लेखी निवेदन सर्व शिक्षक संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रीती देशमुख यांना निवेदन देण्यात आले.

दिनेश भागवत हे जिल्हा परिषद शाळा अडगाव येथील मुख्याध्यापक पदावर कार्यरत असून त्यांना शालेय पोषण आहारामध्ये कसूर केल्याच्या आरोपावरून करण्यात आलेली निलंबनाची कार्यवाही ही अन्यायकारक असून मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाच्या आणि शासन निर्णयाच्याविरुद्ध असल्याबाबत सबळ पुराव्यासह सविस्तरपणे चर्चा करून निवेदन सादर करण्यात आले. शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने दिनेश भागवत यांच्यावर करण्यात आलेली निलंबनाची कार्यवाही तात्काळ मागे घेऊन त्यांना न्याय देण्यात यावा. अशी मागणी यावेळी रेटून धरण्यात आली. यावेळी

महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना, शिक्षक भारती (प्राथमिक) जिल्हा अमरावती, म.रा. बहुजन शिक्षक महासंघ, शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद, अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ, पदवीधर शिक्षक संघटना,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, शिक्षक सेना, जुनी पेन्शन हक्क संघटना, अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना, सेवानिवृत्त शिक्षक संघटना,या शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबतच संवेदनशील शिक्षक बंधू उपस्थित होते. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रीती देशमुख यांनी उचित कार्यवाही करण्यासंदर्भात त्यांना आश्वासित केले.

## 3 गायींना जीवनदान

**अमरावती**- करजगाव-लेहगाव मार्गाने गोवंशांची अवैध वाहतूक करणार्या एका वाहनाला पोलिसांनी 24 जानेवारी रोजी पकडले. माहुली पोलिसांनी एमएच 37/टी 2335 क्रमांकाच्या वाहनाचा पाठलाग केला. त्यावेळी चालकाने लेहगाव रस्त्यावरील एका शेतात वाहन उभे करून तेथून पळ काढला. वाहनात चार गुरे आढळून आली. त्यापैकी एक गोवंशचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी 3 लाख 80 हजार रुपयांची वाहने व गुरे व इतर माल जप्त केला आहे. पुढिल तपास पोलीस करीत आहे.

# प्रफुल्ल देशमुख यांची जिल्हा परिषद शाळेला 10 लाखांची भेट

## इंटरअॅक्टीव्ह पॅनलचे आमदारांचे हस्ते लोकार्पण



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.27 )** - रोजी जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा मांजरखेड कसबा येथे आठ इंटरअॅक्टीव्ह पॅनलचे लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. आमदार प्रताप अडसड व मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, प्रफुल्ल देशमुख यांचे हस्ते आठ वर्ग खोलीत इंटरअॅक्टीव्ह पॅनलचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाला श्री पाताळेश्वर व गुप्तेश्वर देवस्थानचे अध्यक्ष नरेंद्रपंत देशमुख हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या 10 लाखांच्या इंटरअॅक्टीव्ह पॅनलची भेट प्रफुल्ल देशमुख यांनी जिल्हा परिषद शाळेला दिली.

यावेळी आयोजित कार्यक्रमाला गटविकास अधिकारी तेजश्री आवळे, गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे, पंचायत समिती माजी सभापती प्रशांत भेंडे, विस्तार अधिकारी रवींद्र दिवाण, विलास बाबरे, सरपंच पल्लवी देशमुख, माजी सरपंच शैलेश देशमुख, अमोल देशमुख, दिलीप गुल्हाने, संजय सव्वालाखे, अशोक देशमुख, शाळा व्यवस्थापन समितीचे विनोद भोगे, लक्ष्मी नेमाडे, हाफिज काजी, मोहंमद तन्वीर, विषयतज्ञ श्रीनाथ वानखडे, नामदेव मार्डीकर, अमोल चौकडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### कल्पना शक्तीचा विस्तार - आ. प्रताप अडसड

इंटरअॅक्टीव्ह पॅनलद्वारे मुलांच्या कल्पना शक्तीला वाव मिळणार असल्याने त्यांच्या कौशल्यांचा विस्तार होणार आहे. शिक्षकांनी तंत्रज्ञानचा वापर करून विद्यार्थ्यांचा प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी कार्य करण्याचे आवाहन उद्घाटक आ. प्रताप अडसड यांनी केले.

### दानशूरांची भूमिका महत्वाची - संजिता महापात्र

जिल्हा परिषदेतील अनेक विद्यार्थी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतात. त्यांचं शिक्षण सुलभ होण्यासाठी समाजातील अनेक दानशुर व्यक्तींची भूमिका मोलाची आहे. प्रफुल्ल देशमुख यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी म्हटले.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत घुईखेड ची बाजी




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.27 )**- संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियाना अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत तालुकास्तरावर सर्वात जास्त गुण प्राप्त केलेल्या 9 ग्रामपंचायतीची पडताळणी जिल्हास्तरिय समिती केली असून, त्याचा निकाल दि. 26 जानेवारी 2025 रोजी घोषित करण्यात आला. त्यामध्ये चांदूर रेल्वे तालुक्यातील ग्रामपंचायत घुईखेडने बाजी मारत प्रथम स्थान प्राप्त केले आहे.

तसेच अचलपूर तालुक्यातील ग्रामपंचायत वाघडोह ने व्दीतीय स्थान प्राप्त केले तर वरुड तालुक्यातील ग्रामपंचायत मालखेड ने तिसरे स्थान प्राप्त केले आहे. संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियानाची सुरुवात ही दि. 1 मे 2024 पासुन होते. सदर अभियाना मध्ये पाणी गुणवत्ता, पाणी व्यवस्थापन, शौचालय व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, मैला गाळ व्यवस्थापन, मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन, लोकसहभाग ई. विषयाशी निगडीत बाबीच्या अनुषंगाने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीची निवड होते. या करिता सदर ग्रामपंचायतीस 200 प्रश्नाच्या पडताळणी मध्ये गुण प्राप्त करावे लागते. सर्व प्रथम जि.प. गट स्तरावर गटातील सर्व ग्रा. पं. ची पडताळणी करण्यात येते त्यानंतर त्या मधील उत्कृष्ट दोन ग्रामपंचायतीची पडताळणी गट विकास अधिकारी स्तरावरिल समिती मार्फत करण्यात येते. जिल्हास्तरावर सर्व तालुक्यातुन आलेल्या गुण पत्रीके नुसार सर्वात जास्त गुण प्राप्त करणाऱ्या पहील्या 9 ग्रा. पं. ची जिल्हास्तरिय पडताळणी करिता निवड करण्यात येते. या 9 ग्रा.पं. मधून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील पडताळणी समितीने दि.26 जानेवारी 2025 रोजी घोषीत जिल्हास्तरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या ग्रामपंचायतीस अनुक्रमे 6 लक्ष, 4 लक्ष व 3 लक्ष असे बक्षिस देण्यात येणार आहे. तर विशेष पुरस्काराची राशी 50 हजार असून, तिनही ग्रामपंचायतीस प्रत्येकी 50 हजाराचे बक्षिस देण्यात येणार आहे.

### विभाग स्तरासाठी होणार पडताळणी

जिल्हास्तरावर प्रथम आलेल्या घुईखेड व व्दितीय ठरलेल्या वाघडोह ग्रामपंचायतीची विभागस्तरीय पडताळणी डॉ. निधी पाण्डेय विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षते खालील समिती दि.29 जानेवारी 2025 रोजी करणार आहे. विभागस्तरावर प्रथम, व्दितीय व तृतीय पुरस्काराची रक्कम अनुक्रम 12 लक्ष, 9 लक्ष व 7 लक्ष ऐवढी आहे.

# विविध वाचनालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम साजरा



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.27 )**- वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमा अंतर्गत तालुक्यातील विविध वाचनालयांमध्ये विविध कार्यक्रम घेण्यात आले. हा उपक्रम 1 जाने ते 15 जानेवारी या कालावधीत साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला गावकरी, शाळकरी विद्यार्थी वाचक वर्ग उपस्थित होते. उपक्रमा अंतर्गत कार्यक्रमाला सामुहीक वाचन कार्यक्रम व ग्रंथप्रदर्शनी कार्यक्रम साजरा करण्यात आला.

तालुक्यातील हिरापुर येथील श्रीमती वेणुबाई ज रौंदळे वाचनालय, चिंचोणा येथील स्व.रुख्माबाई वा. वानखडे वाचनालय, निमखेड बाजार येथील सातपुडा बहुउद्देशिय सार्वजनिक वाचनालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम साजरा करण्यात आला.यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष उमा रौंदळे, डॉ.सुरेशराव रौंदळे, सचिव संजयराव वानखडे यांच्यासह रवि भगत, बाळू भिसे, हरीभाऊ भगत, अमोल मेश्राम, श्रीकृष्ण कडव, विशाल फरकुंडे, पवन मते, नितीन सहारे, सुभाष वानखडे,ग्रंथपाल सौ प्रियंका वानखडे,संतोष, वानखडे प्रेमदास वानखडे,गजानन गिर्हे,वैभव रौंदळे, पवन रौंदळे, ग्रंथपाल शिल्पा काळपांडे लिपिक करण रौंदळे,गजाननराव काळपांडे,आकाश वानखडे,पवन धवसे, पवन रौंदळे उपस्थित होते.